## इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.

## Walk in Interview सूचना (जाहिरात)

इचलकरंजी म.न.पा. च्या जनगणना विभागाकडील खालील कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात इकडील अटी / शर्तीस अधीन राहून भरण्याकरिता पात्र व इच्छुक उमेदवार यांना खालील नमूद दिनांकास व स्थळी मुलाखतीकरिता बोलाविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | M.T.S.<br>(Multi Tasking Staff) | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी,<br>शासकीय / निमशासकीय संस्था संगणक प्रणालीवर किमान १ वर्षे काम केलेचा अनुभव असणे आवश्यक,<br>MSCIT आणि मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन अर्हता आवश्यक. |
| २ | T.A.<br>(Technical Assistant) | ०५ | B.E /B.Tech Civil ( असल्यास प्राध्यान्य )/B.E computer शैक्षणिक पात्रता धारण करणे आवश्यक,<br>शासकीय / निमशासकीय संस्था / खाजगी कंपनीत Autocad,GIS,Google Earth या प्रणालीवर किमान 2 वर्षे काम केलेचा अनुभव असणे आवश्यक,<br>संगणक MS Excel व Advance Excel मध्ये आवश्यक ते कामकाज करणेचे Skill असणे आवश्यक. |

**अटी / शर्ती**

१) सदर नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार ०६ महिने किंवा जनगणना कामकाज सुरु असेतोपर्यंत, यापैकी जो कमीचा असेल त्या कालावधीकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर करण्यात येणार असून नियुक्त उमेदवारास विहित किमतीच्या मुद्रांकावर करार करून देणे बंधनकारक राहील. मुदतीनंतर आवश्यकता भासल्यास मुदतवाढ देणे किंवा नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांना असतील.

२) देण्यात येणारी नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात म.न.पा. नियमित कर्मचा-यांना देय असणा-या कोणत्याही सवलती, लाभ देय असणार नाहीत. तसेच म.न.पा.सेवेत घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही किंवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३) नमूद पदासाठीची विहित अर्हता मुलाखतीच्या दिनांकास उमेदवाराने धारण केली असणे आवश्यक आहे.तसेच वयोमर्यादा अर्ज सादर करण्याच्या दिनांकास किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे अशी राहील.

५) नियुक्त उमेदवारास केंद्रीय जनगणना कार्यालयाकडून निर्धारित केलेले मानधन प्रतिमहा देय असेल.

६) मुलाखतीसाठी स्वखर्चाने व निर्धारित वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

७) प्रस्तुत जाहिरात / नियुक्ती प्रक्रीयेसंदर्भात काही नवीन सूचना द्यावयाच्या झाल्यास त्या म.न.पा.चे ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांनी नमूद संकेतस्थळ वेळोवेळी अवलोकन करावे.

तरी उक्त अर्हता धारण करणा-या इच्छुकांनी त्यांचे अर्ज आणि शैक्षणिक व अनुभवविषयक कागदपत्रांसह दिनांक ०९.०३.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता अर्ज व अर्हताविषयक अभिलेखांसह निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात मुलाखतीस उपस्थित रहावे. यासंबंधी अधिक माहिती म.न.पा.चे जनगणना विभागाकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत तसेच म.न.पा.चे ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

Digitally signed by
Rahul Sarjerao Mardhekar
Date: 04-03-2026
16:15:40

उपायुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका.